भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ TM 953769

4 JUN 2018 9292

दिनांक ... कोड.नं. २६०१०३६

पो. आण्णासाहेब डांगे महाविद्यालय हातकणंगले द्वारे अमर डांबळे

दानी रु. ( १००/- ) या स्टॅंप मागितलेवरून

त्याचे भरती रु — असे स्टॅंप दिले


मुद्रांक विक्रेता मुद्रांक परवाना क्रं. ६०/२०००-०१ ... रामचंद्र जंगले ... गाळा नं. ११, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

TREASURY OFFICE KOLHAPUR

30 JUN 2018

STAMP HEAD CLERK TREASURY OFFICE KOLHAPUR


## शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

## आणि

## संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे

## मा. श्री. अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

## मु. पो. हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर हा विद्यापीठीय मराठी शिक्षक आणि महाराष्ट्रातील साहित्य आणि भाषाप्रेमी यांचे संघटन आहे. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन आणि विकसन करणे तसेच संशोधन करणे हे संघाचे ध्येय आहे. मराठी शिक्षकांच्या दर्जेदार अध्यापनासाठी ज्ञान प्रसार आणि संशोधन या संदर्भात विविध उपक्रम राबविले जातात. त्यानुसार विविध विषयांवर राष्ट्रीय चर्चासत्र, परिसंवाद कार्यशाळेचे आयोजन केले जाते. विविध

महाविद्यालयातील चर्चासत्रे तसेच कार्यशाळांमध्ये बौध्दिक सहयोगी होऊन सहकार्य केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेचे आणि साहित्याचे विकसन करण्याच्या दृष्टीने निबंधलेखन, कथालेखन, काव्यलेखन, कथाकथन, काव्यवाचन अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. तसेच मराठी प्राध्यापकांच्या शोधनिबंधांना पारितोषिक, ललित व ललितेतर ग्रंथांना पारितोषिक दिले जाते. संघामार्फत 'शिविम संशोधन पत्रिका' हे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक प्रसिध्द केले जाते. त्याचा ISSN No.2319-6025 असून शिवाजी विद्यापीठ आणि यु.जी.सी. मान्यताप्राप्त यादीमध्ये पत्रिकेचा समावेश झालेला आहे.

वरील नमूद केलेल्या शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ आणि संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे मा. श्री. अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर या संस्था एकमेकांबरोबर सामंजस्य करार दि. १० जुलै २०१८ रोजी करत आहेत. या कराराची उद्दिष्टये खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

## उद्दीष्टये

१. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन करणे आणि विविध विषयांवर संशोधन प्रकल्प राबविणे.

२. चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, काव्यसंमेलन, साहित्यसंमेलन, संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे.

३. विद्यापीठीय अभ्यासक्रम, प्रमाणपत्र, पदविका कोर्ससाठी सहयोग व सहकार्य करणे.

४. निबंध, वक्तृत्व, वाद-विवाद, प्रश्नमंजुषा, कथालेखन, काव्यलेखन, काव्यवाचन, कथाकथन स्पर्धांचे आयोजन करणे.

५. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी सहकार्य करणे.

६. व्यक्तिमत्त्व विकास प्रकल्प, कौशल्य विकास प्रकल्प राबविणे.

CamScanner

कोल्हापूर

७. दरवर्षी कोल्हापूर, सांगली, सातारा या शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये संघाचे वार्षिक एक/दोन दिवसांचे अधिवेशन विविध साहित्यिक विषयांवर घेणे. सदर अधिवेशनात प्राध्यापकांच्या शैक्षणिक तसेच विषयांच्या समस्यांवर चर्चा करणे.

८. सर्जनशील लेखन, उपयोजित मराठी लेखन प्रकल्प राबविणे.

९. मोडी लिपी, मुद्रितशोधन, पत्रकारिता इत्यादी अभ्यासक्रमांचे आयोजन करणे.

१०. ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सहकार्य करणे. ग्रंथाचे प्रकाशन व चर्चा घडवून आणणे.

११. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती या संबंधाने येणाऱ्या समस्या व अडचणी विद्यापीठ, शासन आणि विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांना यासंदर्भात सूचना-पत्रव्यवहार करणे.

## एकमेकांना सहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे

१. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये तसेच प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणे.

२. विविध उपक्रमाचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे.

३. उपलब्ध साधनसामुग्रीनुसार या संस्थाकडून एक निश्चित योजना तयार करणे.

४. त्रैमासिकाव्दारे साहित्य, विचार यांची देवाणघेवाण करणे.

५. दरवर्षी संघाचे अधिवेशन विविध कॉलेजवर आयोजित करुन विचारविनीमय करणे.

६. शासन, साहित्य अकादमी, मराठी साहित्य व संस्कृती महामंडळ, राज्य मराठी विकास संस्था यांचे उपक्रम सौजन्याने राबविणे.

## अटी

१. आपआपल्या खर्चाने एकमेकांना सहकार्य करणे.

२. परस्पर सामंजस्य करारातील उदाहरणांचे नुतनीकरण करणे आणि परस्परांच्या लेखी करारांची कोणत्याही क्षणी समाप्ती केली जाऊ शकते. साठ दिवसांच्या पूर्व लेखी सूचनेनुसार दोन्हीपैकी कोणत्याही संस्थेला करार संपुष्टात आणता येईल.

CamScanner

३. कोणत्याही महाविद्यालयांस प्रवास व भोजन भत्ता देणे बंधनकारक नाही.

४. सदर परस्पर सामंजस्याचा कराराचा कालावधी पाच वर्षानंतर संपुष्टात येईल.

५. परस्पर सहमतीने आणखी पाच वर्षासाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल.

६. यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता बंधनकारक असेल.

## समन्वय

१. सदर कराराची जबाबदारी, समन्वय आणि अंमलबजावणीसाठी शिक्षक संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव कार्यरत राहतील. तसेच महाविद्यालयाचे समन्वयक म्हणून प्राचार्य अथवा विभागप्रमुख काम करतील.

२. सदर सामंजस्य करार कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटीशी अधीन राहून दोन प्रतीमध्ये अंमलात येत आहे.

३. खालील स्वाक्षऱ्यांचा सदरहू परस्पर सामंजस्य करार हा पुढील समन्वयिक अधिकाऱ्यांत होत आहे तसेच वर नमूद केलेल्या दिनांक व वर्षानुसार अंमलात येत आहे.

स्थळ - मा. श्री. अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

दिनांक - १० जुलै २०१८

| | | | | |
|---|---|---|---|---|
| डॉ.अमर कांबळे | प्रा.एकनाथ पाटील | डॉ.योजना जुगळे | डॉ. प्रकाश दुकळे | डॉ. शिवकुमार सोनाळकर |
| समन्वयक | विभाग प्रमुख | प्राचार्या | सचिव | अध्यक्ष |

डॉ. योजना वसंतराव जुगळे
प्राचार्या,
मा. श्री. अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हातकणंगले, जि. कोल्हापूर.

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

मा. श्री. अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ,
कोल्हापूर

CamScanner